Jagdamba Education Society's

**Jagdamba Education Society's**

# Santosh N. Darade Polytechnic

**At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401**

## * Central Library *

Accredited by

NATIONAL BOARD OF ACCREDITATION

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 07/10/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**


आपलं महानगर | My महानगर.com

www.mymahanagar.com


## दिनविशेष



### आधुनिक मराठी काव्याचे प्रवर्तक केशवसुत

केशवसुत हे आधुनिक मराठी काव्याचे प्रवर्तक म्हणून ओळखले जाणारे एक श्रेष्ठ कवी होते. त्यांचे पूर्ण नाव कृष्णाजी केशव दामले. काव्यरत्नावली या मासिकाचे संपादक नारायण नरसिंह फडणीस यांच्या सूचनेवरून 'केशवसुत' या टोपणनावाचा त्यांनी स्वीकार केला. त्यांचा जन्म ७ ऑक्टोबर १८६६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील मालगुंड या गावी झाला. त्यांचे शिक्षण खेड, बडोदे, वर्धा, नागपूर व पुणे या ठिकाणी झाले. शिक्षणकालातच १८८० मध्ये त्यांचा विवाह झाला. मॅट्रिकनंतर (१८८९) मुंबईला १८९७ पर्यंत निरनिराळ्या हंगामी नोकऱ्या केल्या. पुढे प्लेगमुळे मुंबई सोडून ते खान्देशात गेले.

केशवसुतांनी विद्यार्थीदशेतच काव्यलेखनास आरंभ केला असला, तरी त्यांचा मुख्य काव्यरचनाकाल १८८५ ते १९०५ हाच होय. या काळातील त्यांच्या सुमारे १३५ कविता आज उपलब्ध आहेत. केशवसुतांनी लिहिलेल्या कवितांपैकी, 'स्फूर्ति', 'कवितेचे प्रयोजन', 'आम्ही कोण?' आणि 'प्रतिभा' या कविता महत्त्वाच्या आहेत. व्यापक मानवी जीवनाच्या संदर्भात कवी व कवित्व यांच्या कार्याची आदर्शवादी भूमिका केशवसुतांनी मांडलेली असल्यामुळे त्या भूमिकेत चिरंतन प्रेरकता जाणवते. त्यांच्या निसर्गविषयक कवितांवर वर्डस्वर्थ व एमर्सन यांच्या विचारांचा प्रभाव दिसतो. सृष्टीतील सौंदर्य काव्याला प्रेरक ठरते. त्यात मानवी जीवनातील विषमतेचा अभाव असल्याने निसर्गसहवास सुखद ठरतो, अशा दृष्टीने केशवसुत निसर्गाकडे बघतात. 'भृंग', 'पुष्पाप्रत' व 'फुलपाखरू' या त्यांच्या काही महत्त्वाच्या निसर्गकविता होत. क्रांतिकारक सामाजिक विचार ओजस्वीपणे व्यक्त करणाऱ्या त्यांच्या प्रसिद्ध कविता म्हणजे, 'तुतारी', 'नवा शिपाई' व 'गोफण केली छान' या होत. गूढ अनुभूती व तिची नावीन्यपूर्ण अभिव्यक्ती असलेली 'झपूर्झा' ही त्यांची कविता विशेष गाजली. अशा या महान कवीचे ७ नोव्हेंबर १९०५ रोजी निधन झाले.


Nashik Edition

Oct 07, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com



S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK


Jagdamba Education Society's

SND POLYTECHNIC

KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401